ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# भारताचे राजकीय वर्तमान

डॉ. मनोहर नाईक, नागपूर

★★★

माहिती तंत्रज्ञानाच्या युगातूनच जाहिरातींचे दांभिक युग उदयास आले आणि या युगाने अवघे विश्व आपल्या ताब्यात घेतले. जाहिरातीत सत्यापेक्षा आभासाला अधिक महत्त्व असते. जाहिरातींमधून प्रभावीपणे आभासी चित्र उभे करण्याची कला ज्याला अधिक साध्य होते तो यशस्वी होतो, याचा प्रत्यक्ष अनुभव समस्त भारतीयांनी राजकीय पटलावर २०१४ साली घेतलेला आहे आणि घेत आहेत.

धर्माचा आधार आणि जाहिरातींचा बाजार मांडून 'अच्छे दिन' चे आभासी चित्र भारतीय जनता पक्षाने मतदारांपुढे उभे केले.त्यातून या पक्षाने राजकीय सत्ता प्राप्त केली. लोकशाही मार्गाने सत्ता प्राप्त करण्याचा सर्वच राजकीय पक्षांना समान अधिकार आहे. परंतु लोकशाहीवरच प्रहार करणे हा संविधानद्रोह व राष्ट्रद्रोह आहे. हा मार्ग लोकशाहीमारक आहे.भारताचे राजकीय वर्तमान याच मार्गाने पुढे जाताना दिसत आहे. हा मार्ग समस्त भारतीयांना व भारताला अधोगतीकडे घेऊन जाणारा आहे. धर्माचा आधार घेऊन सत्तास्थानी आलेला पक्ष समाजमनातील धर्मभावना

अधिक उत्तेजित करण्याचा सतत खटाटोप करते आहे. धर्म हेच सत्ताधारी पक्षाचे मुख्य भांडवल आहे. सत्ता अधिक भक्कमपणे टिकवून पाशवी पध्दतीने राबविण्यासाठी

**धार्मिक करण** – करणे त्यांनी उघडपणे सुरू केले आहे.त्यासाठी त्यांनी धर्माच्या वेदीवर लोकशाहीचा बळी देण्याची पूर्वतयारी सुरू केली .हे भारतीय जनता पक्षाच्या व मातृसंघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एकूणच कृती आराखड्यावरुन स्पष्ट होवू लागले आहे. मुस्लिम धर्माला शत्रू ठरवून व मुस्लिम धर्मियांविरुध्द विव्देष पेरुन हिंदू धर्मियांना संघटित करणे आणि या संघटित मतांवर सत्ता बळकावून उच्च वर्णीयांच्या तसेच उच्च वर्गीयांच्या हिताचा गुप्त अजेंडा राबविणे हे भाजपचे व आर. एस.एस.चे मुख्य उद्दिष्ट आहे. या उद्देश पूर्तीसाठीच संघ–भाजप मग लवजिहाद, घरवापसी,गोरक्षा,सी.ए.ए., राममंदिर अशा भावनिक मुद्द्यांच्या आधारे धार्मिक विद्वेश पसरवून सामाजिक सौहार्द व राष्ट्रीय एकात्मता बाधित करणारे व आपली राजकीय पकड अधिक घट्ट करणारे क्षूद्र राजकारण करीत आहे.

धर्मव्यवस्थेचा भारतीय समाजमनावर जबरदस्त पगडा आहे. धर्मव्यवस्थेने भारतीय समाजाची विचारशक्ती विकलांग करून बहुजन समाजाला मानसिक गुलाम केले. धर्मसत्तेच्या व राजसत्तेच्या अभद्र युतीतूनच बहुजन समाजाचे शतकानुशतके सर्वांगीण स्वरुपाचे शोषण करण्यात आले. उन्नयनाचे सर्व मार्ग बंद करण्यात आले. धर्माचा हा विषारी विळखा लक्षात घेऊनच भारतीय संविधानाने स्वातंर्त्योत्तर भारतातील राजकारणातून

**धर्म आणि राजकारण**–यांची संवैधानिक फारकत करण्याकरिताच धर्मनिरपेक्ष– धर्मातीत राजकारणाचे तत्व निर्धारित केले आहे. संवैधानिक मर्यादांचा भंग करुन असंवैधानिक मार्गांचा अवलंब करणे हे तर संघ–भाजपाचे चरित्र आहेय आणि धर्म हा तर त्यांच्या राजकारणाचा मूलाधार आहे. वर्णाधारित शोषण व्यवस्था अबाधित राखण्यासाठीच संघाच्या गर्भातून भाजपचे धर्मनिष्ठ राजकारण जन्मास आले आहे. त्यामुळेच भाजपचे राजकारण कायम धर्मकेंद्री राहिले आहे.आणि या धर्मकेंद्री राजकारणास अनुकूल जनमानस तयार करण्याकरिताच संघाच्या वि.ही.प.बजरंग दल, दुर्गा वाहिनी,अ.भा.वि.पी.,वनवासी कल्याण आश्रम अशा वेगवेगळ्या आघाड्या सक्रीय झाल्या आहेत. बाबरी मशीद–रामजन्मभूमी हे भावनिक आंदोलन भाजपने धार्मिक ध्रुवीकरणाच्या दुष्ट हेतूनेच सुरु करुन आपला सत्ताप्राप्तीचा मार्ग प्रशस्त केला आहे.

'भाजप सत्तास्थानी आल्यापासून तर देशात धार्मिक असहिष्णुतेच्या व धार्मिक उन्मादाच्या घटनांनी कळस गाठला आहे. उघड–उघड देशभक्त–देशद्रोही, रामजादे–हरामजादे असे प्रमाणपत्र वाटणे सुरू झाले आहे. धर्माचा अजगर भारतीय लोकशाहीला गिळंकृत करु लागला आहे. या धर्मांध सत्तेने भारतीय लोकशाहीतील महत्त्वपूर्ण स्वायत्त स्वस्थांना दुर्बल केले आहे.नियमबाहय पध्दतीने उच्चवर्णातील अपात्र उमेदवारांना सर्वोच्च श्रेणीतील मुख्य अधिकारी पदांवर नियुक्त करुन प्रशासन व्यवस्था लाचार करण्यात आली आहे. लोकसभेत–कायदेमंडळात भाजपच्या तिकिटावर निवडून गेलेल्या बहुजन लोकप्रतिनिधींवर जरब बसवून त्यांची तोंडे बंद करण्यात आली आहेत. देशाच्या न्यायव्यवस्थेला बटिक बनवून मर्जीनुसार वापरणे सुरू आहे. अशाप्रकारे संघ–भाजपने देशाच्या कायदे मंडळावर, कार्यकारी मंडळावर व न्यायव्यवस्थेवर आपली धर्मांध पकड मजबूत केली आहे. देशाची अर्थव्यवस्था मर्जितील मुठभर भांडवलदारांच्या ताब्यात दिली आहे. आणि महत्त्वाचे म्हणजे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ समजली जाणारी प्रसारमाध्यम यंत्रणा दाराषी बांधून त्यांच्या ताला–सुरातील भुंकण्यातून स्वतरूची स्तुतीस्तोत्रे जनतेला ऐकवली जात आहेत.हे एकूणच भारतीय लोकशाहीच्या पतनाचे संकेत आहेत.

या सर्व घटनाक्रमात भारतीय न्यायव्यवस्थेची भूमिका तर अतिशय संशयास्पद व खेदजनक वाटू लागली आहेकृ भारतीय लोकशाहीची

धर्मनिरपेक्षता अबाधित राखण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी न्यायव्यवस्थेवर असताना सर्वोच्च न्यायालयच भावनिक आधारावर राममंदिर निर्माणाच्या बाजूने निकाल देवून निर्माणकार्यात शासन यंत्रणेला सामिल करुन घेते ही बाब न्यायव्यवस्थेच्या विष्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. त्यात धर्मनिरपेक्ष देशाच्या प्रधानमंत्र्याच्या हस्ते दिनांक ५ ऑगस्ट २०२०ला मंदिर निर्माण कार्याचे भूमिपूजन होणे ही घटना भारतीय लोकशाहीची विटंबना करणारी आहे.तसेच भारतीय लोकशाहीच्या व न्यायव्यवस्थेच्या इतिहासाला कलंकित करणारी आहे.

भारतीय संविधानाने धर्म,पंथ, जात,वर्ण, वर्ग, लिंग, भाषा, प्रदेश या सर्व विविधतेचे विसर्जन करुन प्रत्येक नागरिकाला भारतीयत्वाची नवी ओळख दिली आहे. सर्व नागरिकांना समान दर्जा दिला आहे.या देशातील जाती–धर्माची विभिन्नता व विशमता नष्ट करुन एकसंध भारतीय समाज निर्माण करणे हे भारतीय संविधानाचे अंतिम उद्दिष्ट आहे.या संविधान उद्दिष्टालाच संघ विचारसरणीचा व भाजपच्या भूमिकेचा प्रखर विरोध आहे. विषमता नष्ट होवून समता प्रस्थापित होणे म्हणजे वर्णश्रेष्ठत्व आणि वर्णाधारित शोषणव्यवस्था संपुष्टात येणे होय, हेच त्यांना नको आहे. एकूणच व्यवस्थेत आपले वर्चस्व कायम राखण्यासाठीच त्यांनी राजकारणाला धर्माची जोड देऊन सत्ता हस्तगत केली आहे. बहुसंख्यांकांच्या मनात अल्पसंख्यांकांविषयी जेवढा

**धर्मद्वेश व जातिभेद** – धगधगत राहील तेवढी त्यांची राजसत्तेवरील पकड अधिक घट्ट होणार आहे. म्हणूनच त्यांनी मुस्लिम हिंसेचे गुजरात मॉडेल देशभर राबविणे सुरू केले आहे.दादरी कांड, आसिफा कांड, मुझफ्फरनगर कांड अशी अनेक हत्याकांडे घडवून त्यांनी मुस्लिम धर्मियांना भयभीत केले आहे. आंबेडकरवादी विचारधारा ही त्यांच्या धर्मांध व विषमतावादी राजकारणाच्या मार्गातील फार मोठा अडसर आहे. आंबेडकरवादी विचार हाच या देशातील लोकषाहीवादी व संविधाननिष्ठ आंदोलनांचा मूलस्त्रोत आहे. त्यामुळेच त्यांनी आंबेडकरी आंदोलनांना व आंदोलकांना मुख्य लक्ष्य केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्वालाग्राही विचारांचा धसका घेवूनच त्यांनी भीमा–कोरेगाव हल्ला प्रकरण, उना हल्ला प्रकरण, संविधान होळी अशा अनेक घटना घडवून आणल्या आहेत. त्यांच्या मनुवादाला विरोध करणाऱ्या भिन्न विचारधारेच्या समुदायाला गैरमार्गाने दडपून टाकणे ही त्यांची कुटील व क्रूर प्रवृत्ती आहे. मुस्लिम धर्मियांना भयभीत करून दहशतवादी ठरविणे आणि पुरोगामी–आंबेडकरवादी चळवळीतील कार्यकर्त्यांना व विचारवंतांना माओवादी–नक्षलवादी ठरवून त्यांना तुरुंगात डांबणे हे लोकशाहीवादी विचारांना दडपण्याचे फार मोठे शडयंत्र आहे. एकीकडे विरोधी विचारधारेला जेरबंद करायचे आणि दुसरीकडे विरोधी विचारधारेतील वलयप्राप्त कार्यकर्त्या–नेत्यांना व प्रतिष्ठाप्राप्त व्यक्तींना साम–दाम–दंड–भेद वापरून आपल्या कळपात सामावून घ्यायचे हे मनुवादाचे नवे

**सत्तेचे समीकरण** – आहे. परिवर्तनाची व आपल्या खऱ्या राजकीय अस्तित्त्वाची ओळख होवू लागलेल्या अनेक समाजघटकांना संघ–भाजपने हिंदुत्त्वाच्या फसव्या जाळ्यात ओढून आपली राजकीय शक्ती वाढविली आहे. संघ–शाखांचा विस्तार करून , धार्मिक उन्माद वाढवून , व्यक्तिगत स्वार्थाला खतपाणी घालून ,काही समाजपुढाऱ्यांना अधिक मोठे भासवून अनेक समुदाय हिंदुत्वाकडे आकर्षित केले आहेत. उदारमतवादी व पुरोगामी पक्षात अनेक वर्षे घालवलेल्या बहुजन समाजातील अनेक नेत्यांना सत्ता–संपत्तीचे आमिष दाखवून तर कधी दडपण आणून तसेच सी.बी. आय., ई.डी.चा धाक दाखवून भाजपने पक्षवाढ केली आहे. आमदार–खासदारांच्या खरेदी–विक्रीत तर या पक्षाने उच्चांक गाठला आहे.वनवासी कल्याण आश्रम, सामाजिक समरसता मंच अशा मायावी संघटनांद्वारे नवनवीन समाजघटक जोडून भाजपची शक्ती वाढवणे सातत्याने सुरू आहे. दोन खासदार संख्येवरून स्पष्ट बहुमतापर्यंत मजल मारणे म्हणजे संघ–भाजपच्या कुटील, दांभिक व पाताळयंत्री मनुवादी नीतीला आलेले यश होय.या यशाने संघ–भाजप आता अधिक मग्रुर झाला आहे.उन्मत्त झाला आहे. शक्तिशालीही शांती स्थापित कर सकते हैं! अशी आता ते उघड–उघड आतंकी भाषा वापरु लागले आहेत. हे भाजपने सुरू केलेले दमनपर्व आहे. भाजपचे नेते व मंत्री आता भारतीय लोकशाहीचे रक्षण करु पाहणाऱ्या संविधाननिष्ठ आंदोलकांपुढे उभे राहून देश के गद्दारोंको गोली मारो सालोंकोत्त अशा हिंसक घोषणा देवू लागले आहेत. आणि या घोषणा दिल्यानंतर आंदोलकांवर गोळीबारही करण्यात आला आहे. शाहीनबाग आंदोलनातील महिलांविषयी वापरलेली अर्वाच्च भाषा व झालेले हल्ले,जामिया–इस्लामिया विद्यापीठातील व जे.एन. यु.तील विद्यार्थ्यांवर झालेले हल्ले या सर्व घटना पूर्वनियोजित कटाचा भाग आहेत. रोहित वेमुलाला जीव नकोसा करणे, डॉ.नरेंद्र दाभोळकर, गोविंद पानसरे, डॉ.एम.एम.कलबुर्गी, गौरी लंकेश इत्यादींच्या हत्या घडवून आणणे म्हणजे लोकशाहीवादी व संविधाननिष्ठ लोकांच्या मनात दहशत निर्माण करण्याचा प्रकार आहे. हे देशात सुरू झालेले दमनपर्व आहे. भारतीय राजकारण अल्पावधीतच अकल्पित पध्दतीने बदलू लागले आहे. यापुढे देशातील लोकशाहीची दिशा कोणते वळण घेईल यांचे स्पष्ट संकेत दिसू लागले आहेत. भारतीय संविधानाने दिलेला धर्म निरपेक्ष राजकारणाचा स्पष्ट निर्देश झुगारून आता उघडपणे धर्माधिष्ठित राजकारणाला सुरुवात झालेली आहे. संसदेत विरोधी पक्ष नसला तरी विरोधी पक्षाची भूमिका निभावणाऱ्या पक्षाने देखील एकप्रकारे धर्मनिष्ठ राजकारणाला सहमती दर्शविल्याचे चित्र स्पष्ट होऊ लागले आहे. अलीकडे घेण्यात आलेले काही निर्णय, जाहीर केलेली धोरणे आणि देशात निर्माण झालेली एकूणच परिस्थिती बघता भांडवली धर्मसत्ता इथून पुढे निरंकुश पध्दतीने काही काळ तरी सत्तास्थानी राहील असे सखेद नमूद करण्यासारखे राजकीय वर्तमान आहे.